# केसीई सोसायटीचे एस जळगाव ,मणियार विधी महाविद्यालय .एस.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर अहवाल २०२३-२४

शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत एस एस मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभास बारी समाज शाळेचे अध्यक्ष अशोक तोताराम बारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, शिरसोली चे सरपंच सीमा प्रवीण पाटील, बारी समाज शाळेचे मुख्याध्यापक आर.एस. आंबटकर, बारी समाज शाळेचे चेअरमन कमलाकर तांदळे, सदस्य अर्जुन काटोले, एड. प्रवीण पाटील, रसेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, प्रा. बी. एस. पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक गोपाल बारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. रेड्डी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व घडवण्यातील महत्त्व अधोरेखित केले. मुख्याध्यापक आंबटकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेविषयी गौरव उद्गार काढत विद्यालयाच्या सहकार्याची हमी दिली.

तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राध्यापक धुमाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरादरम्यान गावात राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली व सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी गायत्री या विद्यार्थिनीने राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर राजपूत यांनी केले तर शेवटी चंदन पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. त्यानंतर डॉक्टर विजेता सिंग आणि डॉक्टर ललिता सपकाळे यांचे विशेष सत्र संपन्न झाले. या शिबिरादरम्यान ग्रामस्थांचे आरोग्य तपासणी, ग्रामस्वच्छता अभियान, रक्तदान असे विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे कार्यक्रमाधिकारी गणपत धुमाळे यांनी सांगितले.





उद्घाटन समारंभास बारी समाज शाळेचे अध्यक्ष अशोक तोताराम बारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, शिरसोली चे सरपंच सीमा प्रवीण पाटील, बारी समाज शाळेचे मुख्याध्यापक आर.एस. आंबटकर, बारी समाज शाळेचे चेअरमन कमलाकर तांदळे, सदस्य अर्जुन काटोले, एड. प्रवीण पाटील, रसेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, प्रा. बी. एस. पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक गोपाल बारी









## बारी विद्यालयात मणियार विधी महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर

शिबिरात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी.

**प्रतिनिधी** | शिरसोली

येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत एस. एस. मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिराचे सोमवारी उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर बारी समाज शाळेचे अध्यक्ष अशोक बारी, सरपंच सीमा पाटील, चेअरमन कमलाकर तांदळे, संचालक अर्जुन काटोले, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडवण्यातील महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनीने राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत सादर केले. शिबिरादरम्यान ग्रामस्थांची आरोग्य तपासणी, ग्रामस्वच्छता अभियान, रक्तदान असे विविध उपक्रम राबवले जाणार आहे.

### दिवस दुसरा

जळगांव : शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत दुसऱ्या दिवशी शिरसोली प्रबो येथे ग्रामपंचायत परिसर ते भिल्लवाडा या भागात स्वच्छता अभियान उपक्रम राबवण्यात आले. शिरसोली चे सरपंच सीमा प्रवीण पाटील यांनी अभियानात भाग घेऊन मोहीमेचे उद्धघाटन केले तसेच या मोहीमे अंतर्गत स्वयंसेवकांनी प्लास्टिक कचरा, तुंबलेल्या गटारीतील कचरा व इतर प्रकारचे कचऱ्याचे संकलन केले व त्या दरम्यान ग्रामस्थांकडून होणारा कचरा त्यासंबंधी कारणे व उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय याबबतीत ग्रामस्थांशी संवाद साधला तसेच संपूर्ण अभियान रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे यांच्या मार्गदर्शनात पार पडले. नंतर स्वयंसेवकांनी उपक्रमाला अनुसरून ग्रामस्थांच्या समक्ष पथनाटय सादर केले, या माध्यमातून 'प्लास्टिक मुक्त समाज' व 'स्त्री- पुरुष समानता' हे मोलाचे संदेश स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना दिले. तद्नंतर दूपारच्या व्याख्यान संत्राला डॉ. राजू गवारे व डॉ. योगेश महाजन यांनी उपस्थिती लावली. डॉ. गवारे यांनी 'ऑनलाईन पद्धतीने होणारी मतदार नोंदणी  व येणाऱ्या समस्या' आणि डॉ. योगेश महाजन यांनी 'पर्यावरण संरक्षण व संवर्धन' या विषयांवर अनुक्रमे स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.






दुसऱ्या दिवशी शिरसोली प्रबो येथे ग्रामपंचायत परिसर ते भिल्लवाडा या भागात स्वच्छता अभियानात शिरसोली चे सरपंच सीमा प्रवीण पाटील यांनी भाग घेऊन मोहीमेचे उद्धघाटन केले. दुसऱ्या छायाचित्रात प्लास्टिक मुक्त अभियानात प्लास्टिक उचलताना रासेयो स्वयंसेवक.





स्वयंसेवकांनी उपक्रमाला अनुसरून ग्रामस्थांच्या समक्ष पथनाटय सादर केले, या माध्यमातून ‘प्लास्टिक मुक्त समाज’ व ‘स्त्री- पुरुष समानता’ हे मोलाचे संदेश स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना दिले. डॉ. गवारे यांनी 'ऑनलाईन पद्धतीने होणारी मतदार नोंदणी  व येणाऱ्या समस्या’ प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

दिवस तिसरा

जळगांव : शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत तिसऱ्या दिवशी शिरसोली येथून काही अंतरावर असणाऱ्या रामदेववाडी तलाव परिसरात पक्षी निरिक्षणाचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला पक्षीनिरिक्षक प्रा. राजेंद्र गाडगीळ आणि सौ. शिल्पा गाडगीळ तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपतराव धुमाळे यांनी आपली उपस्थिती लावली. दोघ पक्षीनिरिक्षकांनी रासेयो च्या स्वयंसेवकांना पक्ष्यांचे जतन, संवर्धन व जागृतीची गरज ओळखून भारतातील विविध अधिवासातील पक्ष्यांचा अभ्यास यासंबंधी सखोल मार्गदर्शन केले. तसेच पक्षी निरिक्षनादरम्यान थेट निरिक्षकांनी ३०-४० पक्षी व त्यांच्या विविध प्रजातींची ओळख स्वयंसेवकांना करून दिली  व स्वयंसेवकांनी त्यासंबंधी सर्व माहिती आपल्या रासेयो च्या नोंदवहीत नोंद केली. यानंतर रासेयो च्या स्वयंसेवकांनी शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील परिसर स्वच्छ केला तसेच गटार स्वच्छता सुद्धा करण्यात आली. तदनंतर दूपारच्या व्याख्यान सत्राला ॲड रूपाली भोकरीकर मॅडम आणि डॉ. साहेबराव पडलवार यांनी उपस्थिती लावली. डॉ. पडलवार यांनी समर्थ भारतातील नागरिकांची भूमिका तसेच ॲड. रूपाली मॅडम यांनी ग्रामस्थांच्या वैधानिक समस्या व उपाय या विषयांवर अनुक्रमे स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या व्याख्यान सत्राचे सुत्रसंचालन  रासेयो चे स्वयंसेवक गायत्री मोरे, उत्कर्षा नारायण आणि आभार प्रदर्शन कन्हैया भारोटे यांनी केले.





रामदेववाडी तलाव परिसरात पक्षी निरिक्षणाचा उपक्रम राबवण्यात आला. उपक्रमाला पक्षीनिरिक्षक प्रा. राजेंद्र गाडगीळ आणि सौ. शिल्पा गाडगीळ तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपतराव धुमाळे यांनी आपली उपस्थिती लावली.






व्याख्यान सत्राला ॲड रूपाली भोकरीकर मॅडम आणि डॉ. साहेबराव पडलवार यांनी उपस्थिती लावली. डॉ. पडलवार यांनी समर्थ भारतातील नागरिकांची भूमिका तसेच ॲड. रूपाली मॅडम यांनी ग्रामस्थांच्या वैधानिक समस्या व उपाय या विषयांवर अनुक्रमे स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

दिवस चौथा

जळगाव - शिरसोली येथे आयोजित एस.एस. मनियार विधी महाविद्यालय, जळगाव च्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सात दिवसीय विशेष हिवाळी शिबीराचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपतराव घुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली चौथ्या दिवसाचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात प्रार्थना आणि योगाभ्यासाने करण्यात आली. त्याचवेळी ह. भ. प. श्री. प्रशांत महाराज मोरे देहूकार (जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज)आणि ह. भ. प. श्री. दत्त महाराज दोन्हे यांनी वारकरी संप्रदायासोबतच आदर्श जीवन कसे असावे, याविषयी बोलनांना विविध अभंगांचे संदर्भ देत स्वयंसेवकांमध्ये शिक्षणासोबत नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा विकास करण्याच्या आवश्यकतेवर मार्गदर्शन केले. त्यानंतर स्वयंसेवकांनी शिरसोली गावाच्या प्रत्येक घरात जाऊन मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांची मतदान नोंदणी  करून देत मतदान जागृतीची मोहिम राबविली. तसेच शिबीरांतर्गत रासेयोमार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या मोफत आरोग्य तपासणी विषयीची माहिती देखील स्वयंसेवकांकडून घरोघरी जाऊन पोहोचवण्यात आली. त्यासोबतच स्वयंसेवकांनी गावात स्वच्छता अभियान राबवून गावकऱ्यांमध्ये स्वच्छतेचा संदेश दिला.

शिबीराच्या चौथ्या दिनानिमित्त दुपारच्या बौध्दिक सत्रात आयोजित व्याख्यानमालेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. गणेश सूर्यवंशी आणि डॉ. रेखा पाहुजा उपस्थित होते. यात, ग्रामीण जीवन आणि साहित्य याविषयावर बोलतांना, प्रा. सूर्यवंशी म्हणाले की, आधुनिक काळात वाचन संस्कृती हळूहळू कमी होत चालली असून ते थांबवण्यासाठी वैचारिक

पातळीवर साहित्याविषयी जण जागृती करण्याची गरज आहे. तर डॉ. पाहुजा सायबर साक्षरता आणि सुरक्षा याविषयावर बोलतांना म्हणाल्या की, सोशल मीडियाचा वापर करतांना विविध प्रकारचे धोके असून सजग,सतर्क व सायबर साक्षरतेबाबत सावध राहून त्याचा वापर केल्यास संभाव्य धोके टाळता येतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका जाधव, वैभव बिऱ्हाडे, मयुर राजपुत यांनी केले तर आभार गुलाबसिंग पाडवी यांनी मानले.





ह. भ. प. श्री. प्रशांत महाराज मोरे देहूकार (जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज)आणि ह. भ. प. श्री. दत्त महाराज दोन्हे यांनी मार्गदर्शन केले.





प्रा. गणेश सूर्यवंशी आणि डॉ. रेखा पाहुजा मार्गदर्शन करताना. दुसऱ्या फोटोत रासेयो स्वयंसेवक रात्रीची प्रतिज्ञा म्हणताना.

दिवस पाचवा

जळगांव : शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत पाचव्या दिवशी शिरसोली प्रबो येथे रासेयो च्या माध्यमातून लोगन फौंडेशन च्या मार्फत मोफत आरोग्य शिबिर आणि रेडक्रॉस इंडियन सोसायटी मार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळेस तपासणी साठी विविध तज्ञ डॉक्टराना बोलिविण्यात आले यामध्ये डॉ.कायनात शेख (स्त्रीरोगतज्ज्ञ ),डॉ.रोशनी चांडक(अस्थिरोग तज्ञ ),अंकित आनंद (नेत्ररोग तज्ञ) ,दिक्षा पाटील(न्याचरो पॅथी) यांचा समावेश होता. शिबिराचे उदघाटन हे शिरसोली चे सरपंच सौ.सिमा पाटील, लोगन फौंडेशन चे अध्यक्ष adv. गणेश पाटील, ग्रामसेवक दिलीप पाटे (शिरसोली प्रबो), यांच्या हस्ते करण्यात आले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.धुमाळे यांनी कार्यक्रमचे प्रास्ताविक मांडून कार्यक्रमाचे महत्व समजावून दिले .आरोग्याशिबिरा दरम्यान रासेयो च्या स्वयंसेवकांनी आरोग्य व रक्तदाना संबधी ग्रामस्थाना जनजागृती केली त्याप्रमाणे ग्रामस्थांनी शिबिरात सहभाग घेऊन उत्साह पूर्ण तपासणी करून घेतली.या दरम्यान विविध प्रकारच्या रोगांवर तपासनी करण्यात आली ज्यामध्ये मधुमेह, हाडांचे रोग, त्वचा रोग, डोळयांची तपासणी व विविध प्रकरच्या

रोगांवर तपासनी करण्यात आली. तसेच ग्रामस्थांनी रक्तदानाचे महत्व समजून घेतल्यावर रक्तदानात भाग घेतला.या कार्यक्रमाची पार्श्वभूमी यात रासेयो च्या स्वयंसेवकांनी गावात गल्लोगल्ली जाऊन आरोग्य शिबिर आणि रक्तदान शिबिरासंबंधी जनजागृती करून ग्रामस्थांना शिबिर सहभागाचे आमंत्रण दिले होते तसेच स्वयंसेवकानी मतदार नोंदणीत नोंद नसलेल्या व्यक्तींचे मतदान नोंदी सुद्धा करून घेतल्या. तदनंतर व्याख्यानसत्राला बी युवाकुमार रेड्डी, adv.गणेश चव्हाण तसेच डॉ. डी आर.क्षीरसागर यांनी उपस्तिथी लावून रासेयो च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.











शिरसोली प्रबो येथे रासेयो च्या माध्यमातून लोगन फौंडेशन च्या मार्फत मोफत आरोग्य शिबिर आणि रेडक्रॉस इंडियन सोसायटी मार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी.

दिवस सहावा

जळगांव : शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत सहाव्या दिवशी शिरसोली प्रबो येथे रासेयो च्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. यादरम्यान अपघात स्थळी मदत करताना कोणत्या बाबीची खबरदारी घेणे आवश्यक आहे. एखाद्या स्थळी आग लागल्यास कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. प्रथमोपचार कसा करावा याचे प्रात्यक्षिक देण्यात आले.

तदनंतर व्याख्यानसत्राला डॉ. विकास निकम यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी मेडिटेशन या विषयावर मार्गदर्शन करताना मेडिटेशन हे समाजवास्तवापासून तोडणारे नसून जोडणारे असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर डॉ. अंजली बोंदर यांनी नवीन शैक्षणिक धोरण संदर्भात मार्गदर्शन केले.









दिवस सातवा

जळगांव : शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत सातव्या दिवशी शिरसोली प्रबो येथे रासेयो च्या माध्यमातून प्रबोधन फेरी आयोजित करण्यात आली. या फेरीदरम्यान कौटुंबिक हिंसाचार, जादू टोना विरोधी कायदा, ग्राहक संरक्षक कायदा आणि मतदार जागृती इत्यादी विषयावर पथनाट्याच्या माध्यमातून प्रबोधन व जनजागृती केली. त्यानंतर बारी समाज विद्यालय परिसराची स्वच्छता केली.

समारोप समारंभास प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. रासेयो स्वयंसेवकांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. स्वाती लोखंडे यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रम अधिकारी प्रा. धुमाळे यांनी सात दिवस चाललेल्या शिबिराचा आढावा मांडला व सर्व मान्यवर, गावकरी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि बारी समाज शाळेचे आभार मानले.

















# मणियार महाविद्यालयातर्फे शिरसोली येथे रासेयोचे हिवाळी शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जळगाव** ■ शिरसोली येथे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरा अंतर्गत अंतिम दिवशी शिबिराचे समारोप समारंभ पार पडले.

यावेळी बारी समाज शिक्षण संस्थेचे सचिव सुरेश अस्वार, बारी समाज प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गोपाळ बारी तसेच एस एस मणियार विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. युवाकुमार रेड्डी आणि रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक गणपत धुमाळे व प्राध्यापिका स्वाती लोखंडे यांची उपस्थिती लाभली. या समारंभात रासेयोच्या स्वयंसेवकांनी आपल्या सात दिवसीय शिबिरातील वैयत्तिक अनुभव कथन केले. तत्पूर्वी शिरसोली प्रबो आणि शिरसोली प्रन या परिसरात रासेयोच्या स्वयं सेवकांनी प्रभातफेरी काढली यादरम्यान स्वयंसेवकांनी विविध घोषणा देऊन मतदान आणि ग्राहक सुरक्षा संबंधी तसेच स्वच्छता व महिलांचे अधिकारासंबंधी जनजागृती केली. या विषयांना अनुसरून स्वयंसेवकांनी जागोजागी ग्रामस्थां समक्ष विविध विषयांवर पथनाट्य सादर केले. यात ग्राहक सुरक्षा व त्यांचे अधिकार, स्त्रीयांवर होणाऱ्या घरगुती हिंसा, मतदानाचे हक्क व मतदाराचे कर्तव्य तसेच अंधश्रद्धा निर्मूलन अश्या प्रकारच्या पथनाट्यांतून जनजागृती केली तसेच या विषयांसंबंधीत असणारे कायदे व तरतूदी आणि सेवा या संबंधीत सुद्धा मार्गदर्शन करून दिले. या दरम्यान रासेयोच्या स्वयंसेवकांना ग्रामस्थांकडून चांगला प्रतिसाद मिळाला , तदनंतर स्वयंसेवकांनी निवासस्थानी परतल्यावर बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील मैदानी परिसरात स्वच्छता अभियानाचा उपक्रम राबवला. समारंभावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणपत धुमाळे यांनी केले तसेच सुत्रसंचालन प्रतिक्षा बानाईत व कल्याणी कोकाटे आणि आभारप्रदर्शन प्रा स्वाती लोखंडे यांनी केले. अश्याप्रकारे एस एस मणियार विधी महाविद्यालयामार्फत राबवलेले रासेयोचे सात दिवसीय विशेष हिवाळी शिबिर यशस्वीपणे पार पडले.

## बारी विद्यालयात मणियार विधी महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर



शिबिरात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी.

**प्रतिनिधी** | शिरसोली

दिव्य मराठी 06/02/2024

येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत एस. एस. मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिराचे सोमवारी उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर बारी समाज शाळेचे अध्यक्ष अशोक बारी, सरपंच सीमा पाटील, चेअरमन कमलाकर तांदळे, संचालक अर्जुन काटोले, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडवण्यातील महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनीने राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत सादर केले. शिबिरादरम्यान ग्रामस्थांची आरोग्य तपासणी, ग्रामस्वच्छता अभियान, रक्तदान असे विविध उपक्रम राबवले जाणार आहे.

दिव्य मराठी

## शिरसोलीत पथनाट्याद्वारे प्लास्टिक मुक्तचा संदेश



शिरसोली येथे स्वच्छता अभियानात सहभागी सरपंच सीमा पाटील, प्रा गणपत धुमाळ व मणियार विधी महाविद्यालयाचे स्वयंसेवक.

**प्रतिनिधी** | शिरसोली

शिरसोलीच्या बारी विद्यालयात एस. एस. मणियार विधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर सुरु आहे. याअंतर्गत मंगळवारी स्वयंसेवकांनी प्लास्टिक मुक्त समाज, स्त्री-पुरूष समानता या विषयावर पथनाट्यातून जनजागृती केली. तसेच गावात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

शिरसोली प्र बो सरपंच सीमा पाटील यांनी झाडू मारत स्वच्छता अभियानाचे उद्घाटन केले. शिबिरात सहभागी स्वयंसेवकांनी प्लास्टिक कचरा, ओला कचरा व सुखा कचरा याची विल्हेवाट कशी लावावी याबाबत मार्गदर्शन केले. कचरा साचल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची जाणीव देखील करून दिली. पथनाटयद्वारे 'प्लास्टिक मुक्त समाज' व 'स्त्री-पुरुष समानता'वर जनजागृती केली. दुपार सत्रात व्याख्यानात डॉ. गवारे यांनी ऑनलाइन होणारी मतदार नोंदणी व येणाऱ्या समस्या, डॉ. योगेश महाजन यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धन या विषयांवर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. रासेयो अधिकारी प्रा. गणपत धुमाळ यांनी देखील मार्गदर्शन केले.

## मनियार लॉ कॉलेजतर्फे पक्षी निरीक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** एस. एस. मणियार विधि महाविद्यालयामार्फत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर शिरसोलीत सुरू आहे. याअंतर्गत रामदेववाडी तलाव परिसरात पक्षी निरीक्षणाचा उपक्रम राबविण्यात आला. पक्षी निरीक्षक प्रा. राजेंद्र व शिल्पा गाडगीळ, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपतराव धुमाळे -उपस्थित होते.

यावेळी रासेयोच्या स्वयंसेवकांनी शिरसोलीतील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचा परिसर स्वच्छ केला. डॉ. साहेबराव पडलवार यांनी भारतातील नागरिकांची भूमिका व ॲड. रूपाली भोकरीकर यांनी ग्रामस्थांच्या वैधानिक समस्या व उपाय या विषयांवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन स्वयंसेवक गायत्री मोरे, उत्कर्षा नारायण यांनी केले. आभार कन्हैया भारोटे यांनी मानले.

लोकमत 9/02/2024

## शिरसोली येथील हिवाळी शिबिरात ग्रामस्थांची केली आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरसोली :** लोगन फाउंडेशन व गोदावरी फाउंडेशनच्या वतीने एस. एस. मणियार विधी महाविद्यालयामार्फत सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिरात पाचव्या दिवशी शिरसोली प्र. बो. येथे ग्रामस्थांची रासेयोच्या माध्यमातून आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ. कायनात शेख, डॉ. रोशनी चांडक, डॉ. अंकित आनंद, डॉ. सुमित म्हसने, डॉ. दीक्षा रूपेरी आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. शिबिराचे उद्घाटन शिरसोलीच्या सरपंच सीमा पाटील, लोगन फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. गणेश पाटील, ग्रामसेवक दिलीप पाटे यांच्या हस्ते करण्यात आले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. धुमाळे यांनी प्रास्ताविक केले.



शिबिरांतर्गत तपासणी करण्यासाठी आलेले ग्रामस्थ व तपासणी करताना डॉक्टर वर्ग.

12/02/2024

रासेयो कार्यक्रम अधिकारी — प्राचार्य

स्वाक्षरी व शिक्का — स्वाक्षरी व शिक्का